**-: प्रेसनोट :-** दिनांक - १३/०५/२०२६

**फायरिंग करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केलेल्या गुन्हयातील दोन आरोपींना अटक करुन गुन्हे शाखा, मुंबई ने गुन्हा उघडकीस आणलेबाबत.**

भायखळा पोलीस ठाणे गु.र.क्र. २५८/२०२६ कलम १०९, ३०८, ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ सह कलम ३७(१)(अ), १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा सह कलम ३, २५ शस्त्र अधिनियम या गुन्हयात दिनांक १२/०५/२०२६ रोजी १७.४५ वाजताचे सुमारास फिर्यादी नामे समीर मोहमद असीफ खान, वय ४१ वर्षे यांचेवर डॉकयार्ड रोड, मिनाक्षी अपार्टमेंट, माझगाव, मुंबई या ठिकाणी एक अज्ञात इसमाने त्याचे फिर्यादीवर फायरिंग करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन भायखळा पोलीस ठाणे येथे वर नमुद गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखेकडून सुरु असताना तांत्रिक व मानवी कौशल्य वापरुन सदरचा गुन्हा आरोपी क्रमांक ०१, वय ३० वर्षे याने फायरिंग केली व आरोपी क्रमांक ०२, वय ३३ वर्षे हा त्याचा साथीदार होता, अशी माहिती प्राप्त झाली. तसेच त्यांचे ठिकाण माहिम दर्गा परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तिथे त्वरीत पोलीस पथक पाठवून आरोपींचा शोध घेता, आरोपी दिनांक १३/०५/२०२६ रोजी मध्यरात्री मिळून आले.

आरोपीतांकडून गुह्यात वापरण्यात आलेले हत्यार, मोटर सायकल व मोबाईल फोन हस्तगत करण्यात येत आहेत. पुढील तपास गुन्हे शाखा, युनिट -३ कडुन सुरु आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) मुंबई श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन व मा. सहा. पोलीस आयुक्त, प्रकटीकरण (मध्य) श्री. सदानंद राणे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष -३ चे प्रभारी पोलीस निरीक्षक सदानंद येरेकर, कक्ष-२ चे प्रभारी पोलीस निरीक्षक दिलीप तेजनकर, पोलीस निरीक्षक शरद धराडे, पोलीस निरीक्षक सुहास माने, स.पो.नि. अमोल माळी, स.पो. नि. रामदास कदम, सपोनि राकेश देशमुख, स.फौ. अरुण घाटकर, स.फौ. कृतिबास राऊळ, स.फौ. दिपक पालांडे, पो.ह. सुहास कोंकणकर, पो.ह. गिरीश मोरे, पो.ह. सचिन सरवदे, पो.ह.पंकज भोसले, पो.शि. विकास चव्हाण, पो.शि. राहूल पाटील, पो.शि. किरण शेलार, पो.ह. शिर्के, पो.ह.सुनिल हरड, पो.ह. स्वप्नील ढेरे, म.पो. शि. दिपीका ठाकूर, पो.ह.चा. अनिकेत मारे, पो.शि.चा.लक्ष्मण दाईगडे व पो.शि.मारुती खेडकर यांनी पार पाडली आहे.

.......................................................................................................................